कविता

## स्फुल्लिंग

सर्वच ठिणग्या उडतात
अन् तत्काळ विझून जातात
असं होत नाही.
काही ठिणग्या उत्स्फूर्तपणे
चेतवत जातात इत्थंभूत कानाकोपरा
अन् शतकांची जळमटं
जळून जाताना
उग्र दुर्गंधही पसरतो
तत्कालीन परिस्थितीनुसार.
ठिणग्या सक्षम असतात
हे सर्व व्यापून टाकायला,
कित्येकदा असंही होतं
लागलेली श्रेणीबद्ध आग
ओकत जाते अंगार
माण्संही होरपळून जातात त्यात
पण तीच नांदी ठरते
परिवर्तनाची.
ठिणग्यांना काहीच वर्ज्य नसते
पण त्या ठीकठाक
असूच शकत नाहीत
स्फोट होतात भूतलावर
गाढ समुद्राच्या खोल तळाशी
अवकाशाच्या निर्वात पोकळीत
अशा वेळी माण्संही असतात
एक धगधगती ठिणगी
अस्सल कविता लिहिता लिहिता
सृजनालाही जन्म देणारी

**– अरुणचंद्र गवळी**